ग्रंथमालिका ‘धार्मिक कृतींमागील शास्त्र’ : देवपूजा – खंड ४

# देवपूजेपूर्वीची सिद्धता (शास्त्रासह)

मराठी (Marathi)


**संकलक**

हिंदु राष्ट्र-स्थापनेचा उद्‌घोष करणारे

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्ते**

श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ

श्री. निषाद श्याम देशमुख आणि अन्य



**सनातन संस्था**


**सनातनच्या ग्रंथसंपदेचे अद्वितीयत्व !**

सनातनच्या बहुतांशी ग्रंथांतील सुमारे २० टक्के लिखाण हे ‘सूक्ष्मातून प्राप्त झालेले दिव्य ज्ञान’ असून ते पृथ्वीवरील उपलब्ध ज्ञानाच्या तुलनेत अनोखे आहे !

**प्रकाशक** : सनातन भारतीय संस्कृती संस्था
खोली क्र. १०३, सनातन आश्रम, सनातन संकुल,
पोस्ट – 'ओएन्जीसी', देवद, तालुका पनवेल,
जिल्हा रायगड (महाराष्ट्र) ४१० २२१.
दूरभाष क्रमांक : +९१(०२१४३) २३३१२०
**अन्य : गोवा** : +९१(०८३२) २३१२६६४ **रत्नागिरी** : +९१(०२३५२) २२९७७०
**दू.क्र. मिरज** : +९१(०२३३) २२२३१८६ **मुंबई** : +९१ ८६९३०८४५४५
**संगणकीय पत्र (ई-मेल) :** granth@sanatan.org

**मुखपृष्ठ संकल्पना** : सौ. आरती पुराणिक आणि श्री. गुरुदास खंडेपारकर

**आवृत्ती पहिली** : वैशाख कृष्ण पक्ष षष्ठी, कलियुग वर्ष ५११० (२६ मे २००८)
**आवृत्ती पाचवी** : देवदीपावली, कलियुग वर्ष ५१२३ (५ डिसेंबर २०२१)

**आतापर्यंत एकूण ११ सहस्र २०० प्रति प्रसिद्ध !**

**पहिले पुनर्मुद्रण** : वटपौर्णिमा, कलियुग वर्ष ५१२५ (३ जून २०२३)

'देवपूजेपूर्वीची तयारी' या ग्रंथाचे ऑगस्ट २०१५ मध्ये (चौथी आवृत्ती) नाव पालटून 'देवपूजेपूर्वीची सिद्धता' असे करण्यात आले आहे. प्रस्तुत ग्रंथ हिंदी, इंग्रजी, कन्नड आणि गुजराती या भाषांमध्ये उपलब्ध.

**मुद्रणस्थळ** : राम सीता प्रिंटिंग प्रेस, कोल्हापूर

**अर्पणमूल्य** : ₹ ९० /– (₹ 90/-)

**ISBN** 978-93-91069-63-6 ॐ **ग्रंथ क्र.** : ११६

© **प्रकाशक** All rights are reserved. No part of this publication maybe reproduced, stored in a retrieval system or transmitted, in any form or by any means, mechanical, photocopying, recording or otherwise, without prior written permission of the original publisher. Violators will be liable for criminal / civil action.

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्मप्रसारार्थ 'सनातन संस्थे'ची स्थापना

२. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी 'गुरुकृपायोग' या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून २०.४.२०२३ पर्यंत १२३ साधक संत झाले, तर १,०८९ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू आहे.

३. आचारधर्मपालन, देवता, साधना, आदर्श राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विविध विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती

४. हिंदुत्ववादी नियतकालिक 'सनातन प्रभात'चे संस्थापक-संपादक

५. हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्‌घोष (वर्ष १९९८)

६. 'हिंदु राष्ट्रा'च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी आदींचे संघटन आणि त्यांना दिशादर्शन !

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !

स्थूल देहा असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वा ठायी ।।
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ।। – जयंत बाळाजी आठवले

१५.५.१९९६

# सनातनच्या सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्त्या साधकांचे अद्वितीयत्व !



श्रीचित्शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ



श्री. निषाद श्याम देशमुख

सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्ते साधक पृथ्वीवर कुठेही उपलब्ध नसलेले अध्यात्मातील विविध विषयां-वरील सखोल अध्यात्मशास्त्रीय ज्ञान सूक्ष्मातून मिळवतात. ते एखादी घटना, धार्मिक विधी, यज्ञयाग आदींचे सूक्ष्म-परीक्षणही करतात. ईश्वराकडून मिळणारे हे ज्ञान ग्रहण करण्यासाठी त्यांना आसुरी शक्तींच्या आक्रमणांनाही तोंड द्यावे लागते. असे असले, तरी गुरुकृपेच्या बळावर ते ही सेवा करतच आहेत.

---

## ग्रंथाची अनुक्रमणिका

**(काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)**


**१. देवपूजेसंबंधीची पंचकर्मे** १०

**२. देवपूजेची सिद्धता (अर्थ, महत्त्व, लाभ आणि क्रम)** १०

**३. देवपूजेपूर्वीच्या सिद्धतेची (तयारीची) प्रत्यक्ष कृती** १२

**४. देवपूजेपूर्वीच्या सिद्धतेच्या संदर्भातील कृतींमागील शास्त्र** १६

४ अ. स्तोत्रपठण किंवा नामजप करणे १६

४ आ. पूजास्थळाची शुद्धी अन् पूजेच्या उपकरणांची जागृती करणे १९

४ इ. रांगोळी काढणे २४

४ इ ३. देवतेच्या तत्त्वाशी संबंधित रांगोळी का काढावी ? २६

४ इ ५. रांगोळी काढल्यावर तिच्यावर हळदी-कुंकू का वहावे ? २७

४ ई. शंखनाद २८

४ उ. आसनग्रहण ३३

४ उ २. योग्य आणि अयोग्य आसने ३५

४ उ ४. पूजकाच्या पाटाभोवती रांगोळी काढावी कि काढू नये ? ३६

४ ऊ. आचमन करणे ३७

४ ए. देवतांवरील निर्माल्य काढणे ३९

४ ए १. निर्माल्य अंगठा आणि अनामिका यांनी का उचलावे ? ३९

४ ए ३. निर्माल्य काढल्यानंतर त्याचा वास का घ्यावा ? ४४

४ ऐ. आचमन, प्राणायाम, देशकाल उच्चार, संकल्प अन् न्यास ४७

४ ऐ १. आचमन करतांना पाणी पिण्याचा ध्वनी का करू नये ? ४७

४ ओ. कलश, शंख, घंटा आणि दीप यांची पूजा करणे ५२

४ ओ १. कलश, शंख, घंटा व दीप यांची या क्रमाने पूजा का करतात ? ५२

४ ओ ३. उपकरणांवर गंध, अक्षता आणि फूल एकत्रितपणे का वहावे ? ५३

४ औ. पूजासाहित्य आणि पूजास्थळ यांची अन् स्वतःची शुद्धी ५७

४ अं. देवतांच्या मूर्ती आणि चित्रे यांची स्वच्छता ५९

**५. पूजकाने पूजासाहित्याची रचना स्वतःच्या जवळ करणे का योग्य ?** ६३

**६. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी केवळ देवपूजा नाही, तर त्यापुढील टप्प्याची साधना करणे आवश्यक** ६४

**७. देवतांचे विडंबन रोखणे, ही काळानुसार आवश्यक उपासना !** ६४

**卐 काही आनुषंगिक सूत्रे** ६६

**卐 प्रस्तुत ग्रंथाचे असामान्यत्व लक्षात घ्या !** ७०

**卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती** ७३

## ग्रंथाचे मनोगत

नित्य ईश्वरोपासना घडावी यासाठी धर्माने घालून दिलेली एक सोपी आचारपद्धत म्हणजे 'देवपूजा'. देवपूजेमुळे मनात भक्तीभावाचे केंद्र निर्माण होते, देवतेची कृपादृष्टी होते, घरातील वातावरण सात्त्विक बनते, तसेच भावी पिढीवर धार्मिकतेचा संस्कार होण्यासही साहाय्य होते. देवपूजेपूर्वीची सिद्धता (तयारी) हा देवपूजेचा पाया आहे. देवपूजेपूर्वीच्या सिद्धतेमुळे पूजकाची शुद्धी तर होतेच, तसेच तो पूजेतून प्रक्षेपित होणारे चैतन्य ग्रहण करण्यास समर्थ बनतो; म्हणूनच देवपूजेची सिद्धता (तयारी) अत्यावश्यक आहे.

धार्मिक कृती हा एक प्रकारे अध्यात्मशास्त्रातील वैज्ञानिक प्रयोगच असतो. कोणताही प्रयोग करायचा असेल, तर तो नेमक्या पद्धतीने करावा लागतो. धार्मिक कृतीच्या संदर्भातही असेच आहे. योग्य पद्धतीने धार्मिक कृती केली, तरच आपल्याला योग्य फलप्राप्ती होते त्यासाठी धार्मिक कृतीमागील शास्त्र जाणून घेणेही तेवढेच महत्त्वाचे ठरते. शास्त्र जाणून घेऊन कृती केल्यामुळे श्रद्धेची निर्मिती होते. तसेच 'सत्कर्म जर अशास्त्रीय पद्धतीने केले, तर त्या कर्मामुळे अल्पांशाने का होईना मिळणारे फळ अशास्त्रीय लोकांना मिळते', असे धर्म सांगतो. यासाठी धार्मिक कृती शास्त्रानुसार होणेच आवश्यक ठरते. वरील दृष्टीकोन समोर ठेवून या ग्रंथात देवपूजेपूर्वीची सिद्धता (तयारी) आणि तिच्यामागील अध्यात्मशास्त्र यांसंबंधी विवेचन केले आहे.

पूजेपूर्वी स्तोत्रपठण, मंत्रजप आणि नामजप करण्याचे महत्त्व; पूजास्थळ अन् उपकरणे यांची शुद्धी; देवतेच्या तत्त्वाशी संबंधित रांगोळी काढणे; देवपूजेला बसण्यासाठी घ्यावयाच्या आसनांचे विविध प्रकार; देवतांवरील निर्माल्य काढण्याची आणि देवतांची चित्रे अन् मूर्ती पुसण्याची योग्य पद्धत इत्यादी माहितीसह प्रत्यक्ष पूजेला प्रारंभ करण्यापूर्वी आचमन, प्राणायाम,

देशकाल उच्चार, संकल्प आणि न्यास करण्याचे, तसेच कलश, शंख, घंटा अन् दीप यांच्या पूजनाचे महत्त्वही या ग्रंथात सांगितले आहे.

या ग्रंथाच्या वाचनाने पूजेपूर्वीच्या सिद्धतेचे महत्त्व पूजकाच्या लक्षात येऊन त्याच्याकडून ती भावपूर्ण होवो आणि त्यामुळे त्याला पूजेतून अधिकाधिक चैतन्याची प्राप्ती होवो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या 'सच्चिदानंद परब्रह्म' या उपाधीविषयी विवेचन !

१३.७.२०२२ पासून 'सप्तर्षी जीवनाडीपट्टी'च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना 'सच्चिदानंद परब्रह्म' ही उपाधी लावण्यात येत आहे. त्यापूर्वी त्यांना ग्रंथांमध्ये 'प.पू.' आणि 'परात्पर गुरु' या उपाध्यांनी संबोधले आहे. यानुसार ग्रंथाच्या मुखपृष्ठावर आणि ग्रंथात तसा तसा उल्लेख केला आहे.

## सनातनच्या दोन सद्गुरूंच्या नावांच्या आधी विशिष्ट आध्यात्मिक उपाधी लावण्यामागील कारण

जीवनाडीपट्टी-वाचनाद्वारे सप्तर्षींनी केलेल्या आज्ञेनुसार १३.५.२०२० पासून सद्गुरु (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ यांना 'श्रीसत्शक्ति (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ' आणि सद्गुरु (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ यांना 'श्रीचित्शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ' असे संबोधले जात आहे. या संतद्वयी सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी आहेत.

**टीप :** ग्रंथातील काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी अक्षरांत संकेतांक वा सांकेतिक चिन्हे कार्यालयीन सोयीसाठी दिली आहेत. त्यांचा लिखाणाशी संबंध नाही. काही अपरिहार्य कारणामुळे काही संकेतांक इंग्रजीत ठेवले आहेत.